# महापालिका सहाय्यक आयुक्त,ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

कार्यालयाचा पत्ताः-ढोले पाटील रोड, मधुबन हॉटेल शेजारी, पुणे ४११००१.

कार्यालयाचा संपर्क क्र. 02025597345,02025597354 Email- dholepatil@punecorporation.org

विस्तारित क्र.-


जावक क्र:- ६५२३

दिनांक:- २/०३/२०२१

## कोविड - १९ सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र आदेश

विषय :- कोरोना विषाणू कोविड - १९ च्या आजाराच्या अनुषंगाने ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणारे विविध भाग **सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र** (Micro ontainment Zone ) जाहीर करणेबाबत.

संदर्भ : - १. साथ रोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि. १३/०३/२०२०.

२. महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम २०२०.

३. केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

४. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना कोरोना-२०२०/५८आरोग्य/५/दिनांक १३/०३/२०२०.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन स्थापना १९५० * ESTD. 1950 *

माहे फेब्रुवारीच्या प्रथम सप्ताहापासून कोविड - १९ च्या रुग्ण वाढीचा दर वाढला असून साथ आजाराचा मोठ्याप्रमाणात प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारण्यात येत नाही ज्या इमारतीमध्ये ५ पेक्षा जास्त कोविड रुग्ण व ज्या सोसायटी मध्ये २० पेक्षा कोविड रुग्ण आहेत अशा ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून **सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र** ( Micro Containment Zone ) जाहीर करणे अत्यावशक आहे. सदयस्थिती मध्ये ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत खालील ठिकाणे कोविड -१९ च्या संसर्ग वाढत असल्याचे दिसून येत आहे.

| अ. क्र | प्रभाग क्र. | Micro Containment Zone Name | Positive रुग्ण संख्या |
|---|---|---|---|
| १ | २० | शांती कुंज सदन, साधू वासवानी रोड, GPO समोर पुणे ४११००१ | ६ |

तरी कोविड - १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी सदरचा परिसर **सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र** ( Micro Containment Zone ) म्हणून घोषित करण्यात येत आहे. वरील परिसर व त्याच्या आजूबाजूच्या परिसारत राहणाऱ्या नागरिकांनी खालीलसूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

१. सोसायटी / घर / बंगला / चाळ इत्यादी ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांनी त्यांच्या आवारात अथवा घरी भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे पल्स ऑक्सिमीटर आणि थर्मल डिटेक्टरच्या साह्याने तपासणी केली जावी . कोविड साठी पल्स ऑक्सिमीटर तपासणी ही दिशादर्शक आहे . ज्या व्यक्तीची ऑक्सिजन स्याचुरेशन लेवल हि ९४ च्या खाली असल्यास त्यास त्वरित पुढील तपासणीसाठी महापालिकेचे रुग्णालय अथवा खाजगी डॉक्टर यांचे मार्फत तपासणी करून घेण्यासाठी सूचना देण्यात यावी.

२. सोसायटी / घर / बंगला / चाळ इत्यादी ठिकाणी राहणाऱ्या जेष्ठ व्यक्ती / १० वर्षाखालील मुले /आजाराने ग्रस्त आलेले व्यक्ती यांची पल्स ऑक्सि मीटर दैनंदिन तपासणी करून नोंद ठेवण्यात यावी तसेच या अनुषंगाने ऑक्सिजन लेवल हि ९४ किंवा त्याखाली असल्यास अशा व्यक्तींची डॉक्टरांच्या सल्ल्याने तत्काळ स्वॅब टेस्ट करून घेण्यात यावी . स्वॅब टेस्ट करणे करिता ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालया मार्फत पंचशील चौक ताडीवाला रोड OPD येथे मोफत

Scanned with CamScanner

सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे याबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास आपल्या परिसरातील आरोग्य निरीक्षक यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

३. आपले सोसायटी / घर / बंगला / चाळ इत्यादी ठिकाणी कोविड १९ व्यतिरिक्त इतर आजाराकरिता रुग्णालयात दाखल असल्याबाबतची माहिती कृपया dholepatil@punecorporation.org ई मेलवर पाठवावी जेणेकरून पुढील वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात येईल.

४. सोसायटी / घर / बंगला / चाळ इत्यादी ठिकाणी Social Distanace चे पालन केले जाईल व प्रत्येक व्यक्ती मास्क धारण करतील याची दक्षता घ्यावी.

तरी वरील सूचनांचे तंतोतत पालन करावे.

21/3/2021

( दयानंद सोनकांबळे )
महापालिका सहाय्यक आयुक्त
ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत :- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी . . .

१. मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त ( ज ) पुणे महानगरपालिका
२. मा.शहर अभियंता, पुणे महानगरपालिका
३. मा. सहाय्यक आरोग्य प्रमुख पुणे महानगरपालिका
४. मा. उप आयुक्त परिमंडळ क्र. १ पुणे महानगरपालिका
५. मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर
६. मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक ताडीवाला रोड पोलीस स्टेशन पुणे शहर
७. मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर
८. मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर
९. कीटक निरीक्षक, कीटक प्रतिबंधक विभाग, ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय
१०.मा.वैद्यकीय अधिकारी, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA * ESTD. 1950 *

Scanned with CamScanner